# प्रताप महाविद्यालय (स्वायत्त)
# मराठी विभाग
# शैक्षणिक वर्ष २०२३ - २०२४
# शैक्षणिक सहल अहवाल

- **मराठी विभागाची शैक्षणिक सहल**

**उपक्रमाचे नाव :** मराठी विभागाची शैक्षणिक सहल
**कालावधी :** दि. ०६/११/२०२३ ते ०९/११/२०२३
**सहभागी वर्ग :** एस. वाय. बी. ए., टी. वाय. बी. ए., एम. ए. (प्रथम व द्वितीय)
**स्थळे :** महाड, पाली, रायगड, मुरुड-जंजिरा, काशीद बीच, वर्सोली बीच, अक्षी, नगाव.

मराठी विभागाच्या अभ्यासक्रमातील विविध घटकांना प्रत्यक्ष अनुभवाची जोड देण्याच्या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२३—२४ मध्ये चार दिवसांची अभ्यासपूर्ण शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. ही सहल केवळ पर्यटनप्रधान न राहता अभ्यासक्रमाशी सुसंगत, संशोधनपूरक आणि अंतर्विद्याशाखीय दृष्टिकोन विकसित करणारी ठरावी, हा तिचा मुख्य हेतू होता.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना मराठी भाषा, साहित्य, इतिहास, समाजशास्त्र व भूगोल यांचा परस्परसंबंध प्रत्यक्ष स्थळांच्या अभ्यासातून समजून घेण्याची संधी मिळाली. रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीला भेट देताना विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी अभिमानाची भावना निर्माण झाली. महाड येथील क्रांतिभूमी चवदार तळ्याला भेट देऊन सामाजिक समतेच्या चळवळीचे ऐतिहासिक महत्त्व प्रत्यक्ष अनुभवलं.

अक्षी येथे सापडलेल्या आद्य मराठी शिलालेखाविषयी अलिबाग येथील जे. एस. एम. कॉलेजच्या प्रा. हर्षला महाजन यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. त्यामुळे मराठी भाषेचा ऐतिहासिक विकास, लिपीचा प्रवास आणि भाषिक पुरावे यांविषयी विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण माहिती मिळाली.

या सहलीमुळे विद्यार्थ्यांची निरीक्षणशक्ती, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि संशोधनाची आवड वाढली. वर्गात शिकवलेल्या संकल्पनांना प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाल्यामुळे अध्ययन अधिक सखोल व परिणामकारक झाले. एकूणच ही शैक्षणिक सहल मराठी विभागाच्या शैक्षणिक उपक्रमांमध्ये एक महत्त्वपूर्ण व यशस्वी उपक्रम ठरली.



**रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीवर पुष्प अर्पण करताना विभागप्रमुख डॉ. रमेश माने, प्रा. ज्ञानेश्वर कांबळे आणि विद्यार्थी.**



**महाड येथील क्रांतिभूमी चवदार तळयाच्या स्मारकावर डॉ. रमेश माने, डॉ. विलास गावित, प्रा. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. प्रतिभा पाटील.**




**अलिबाग येथील जे.एस. एम. कॉलेजाच्या प्रा. हर्षला महाजन या मराठी भाषेतील आद्य अक्षीच्या शिलालेखाची विद्यर्थ्यांना माहिती देताना.**

डॉ. रमेश माने
प्रमुख- मराठी विभाग
प्रताप महाविद्यालय, (स्वायत्त) अमळनेर.